राज्य शासकीय कर्मचारी गट विमा योजना, १९८२—
जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांना लागू करणे.

# महाराष्ट्र शासन

## ग्रामविकास विभाग

शासन निर्णय, क्रमांक विमा-१०९०/प्र. २८०/१८
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १ सप्टेंबर १९९०

संदर्भ.—(१) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. डीओआय-२१८१/४७०१/एडीएम-५, दिनांक २६ एप्रिल १९८२.
(२) शासन परिपत्रक, वि.वि., क्र. टीआरडब्ल्यू-१३८१/८६७/एडीएम-९, दिनांक ३० एप्रिल १९८२
(३) शासन परिपत्रक, वि.वि., क्र. टीआरडब्ल्यू-१३८१/८६७/एडीएम-९, दिनांक २१ सप्टेंबर १९८२.
(४) शासन निर्णय, वि.वि., क्र. डीओआय-२०८१/सीआर-३३६/८२/एडीएम-५, दिनांक १ फेब्रुवारी १९८३.
(५) शासन निर्णय, वि.वि., गविपो-११८३/प्र. क्र. ६६/८४/प्रशा.-५, दिनांक २८ फेब्रुवारी १९८६.
(६) शासन निर्णय, वि.वि., क्र. गवियो-१०८९/प्र. क्र. ६६४/८९/विमा, दिनांक ८ जानेवारी १९९०.
(७) शासन निर्णय, वि.वि., क्र. गवियो-१०८९/प्र. क्र. ६६४/८९/विमा, दिनांक १४ फेब्रुवारी १९९०.

**निर्णय.**—संदर्भात नमूद केलेल्या दिनांक २६ एप्रिल १९८२ च्या वित्त विभागाच्या निर्णया अन्वये राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना लागू केलेली राज्य शासकीय कर्मचारी गट विमा योजना, १९८२ जी संदर्भात नमूद केलेल्या इतर ६ आदेशान्वये, वेळोवेळी सुधारित करण्यात आली आहे ती योजना जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांना लागू करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. विचारांती शासन, महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ च्या कलम २४८ च्या परंतुका अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करून याद्वारे सदर योजना जिल्हा परिषदेतील वर्ग ३ व वर्ग ४ च्या कर्मचाऱ्यांना १ ऑक्टोबर १९९० पासून लागू करीत आहेत.

२. वेळोवेळी सुधारित केलेले नियम वित्त विभागाकडून पुस्तक रूपाने प्रकाशित करण्यात येत आहेत. त्यास काही अवधी लागेल. यास्तव दरम्यान सदर योजना जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांना लागू करता यावी या दृष्टीने खालील परिच्छेदामध्ये स्पष्टीकरणात्मक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

३. दिनांक १ ऑक्टोबर १९९० रोजी जिल्हा परिषदेच्या सेवेत असलेल्या नियमित कर्मचाऱ्यांना ही योजना सक्तीने लागू करण्यात येईल. यात ५० वर्षे वय असलेल्या किंवा उलटलेल्या कर्मचाऱ्यांचाही समावेश होतो. १ ऑक्टोबर १९९० नंतर जिल्हा परिषदांच्या सेवेत समाविष्ट होणाऱ्या वर्ग ३ व वर्ग ४ च्या नियमित कर्मचाऱ्यांनासुद्धा ही योजना सेवेत दाखल होण्याच्या तारखेपासून सक्तीची होईल. पुढील कर्मचाऱ्यांना ही योजना लागू होणार नाही :—

(अ) कंत्राटी कर्मचारी;

(ब) केंद्र वा राज्य सहकारी क्षेत्रातील उपक्रम किंवा इतर स्वायत्त संस्था, निमसरकारी संस्था यांच्याकडून प्रतिनियुक्तीवर असलेल्या व्यक्ती;

(क) अंशकालिक व तदर्थ कर्मचारी;

(ड) नैमित्तिक कामगार, ते औद्योगिक कर्मचारी (स्थायी आदेश) अधिनियमाच्या कक्षेत येत असले तरी, व औद्योगिक कामगार;

(इ) ज्यांची ५० वर्षे पूर्ण झाल्यानंतर जिल्हा परिषदेच्या सेवेत भरती झालेल्या व्यक्ती;

(फ) ठरा मुदतीत नियुक्त केलेल्या व्यक्ती;

(ग) समुचित प्राधिकरणाद्वारे नियमित कार्यपद्धती अनुसरून रीतसर नियुक्त केली जाईपर्यंत तात्पुरती (स्टॉपगॅप) व्यवस्था म्हणून नियुक्त केलेल्या व्यक्ती;

(हे) कार्यव्ययी आस्थापनेवरील कर्मचारी.

४. योजना जरी दिनांक १ ऑक्टोबर १९९० पासून लागू झाली असली तरी शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत १ जानेवारी १९९० पासून या योजनेचा वर्धापनदिन असल्यामुळे जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या बाबतीतसुद्धा पुढील वर्धापनदिन १ जानेवारी १९९१ राहील व त्यानंतर दरवर्षी १ जानेवारी हा वर्धापनदिन राहील.

५. एखाद्या कर्मचाऱ्यास एका वर्गातून दुसऱ्या वर्गात नियमितपणे बढती मिळाल्यास योजनेच्या पुढील वर्धापनदिनापासून त्याला ज्या वर्गात बढती मिळाली असेल त्या वर्गाच्या योजनेच्या समुचित पातळीप्रमाणे दाद करता येईल. अशी बढती मिळण्यापूर्वी विम्याचे संरक्षण म्हणून जेवढी रक्कम मिळण्यास तो पात्र असेल तेवढीच रक्कम मिळण्यास तो योजनेच्या पुढील वर्धापनदिनापर्यंत पात्र असेल. उदा. वर एखाद्या चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्याला नोव्हेंबर १९९० मध्ये नियमितपणे वर्ग ३ मध्ये बढती मिळाली असेल तर पुढील वर्धापन-दिनापर्यंत म्हणजे दिनांक ३१ डिसेंबर १९९० पर्यंत तो दरमहा रुपये १५ याच दराने वर्गणी देत राहील. तोपर्यंत त्यास फक्त रु. १५,००० इतक्याच विम्याचे संरक्षण व त्याच्या वर्गणीनुसार बचत निधीचे लाभ मिळण्यास तो पात्र राहील. पुढील वर्धापनदिनापासून म्हणजे दिनांक १ जानेवारी १९९१ पासून मात्र त्याची वर्गणी दरमहा रुपये ३० होईल व तो रुपये ३०,००० एवढ्या विम्याच्या संरक्षणास व बचत निधीपासून मिळणाऱ्या समुचित लाभास पात्र राहील.

(शा.म.मु.) एच १३२६ (५,०००—८-९०)

६. वर्गणीच्या रकमेचा एकत्रित रकमा धनादेश जिल्हा परिषदेने दर महिन्याला कोषागारात जमा करावा. त्यासोबत समतुल्य रकमेची गट विमा योजना नमुना २ (परिशिष्ट १) मधील सूचीची (शेड्यूल) प्रत जोडावी.

७. योजना अंमलात आल्यानंतर सेवेत दाखल होणाऱ्या कर्मचाऱ्यांना योजनेच्या पुढील वर्धापनदिनी योजनेचे सदस्य म्हणून दाखल करून घेण्यात यईल. योजनेच्या वर्धापनदिनाच्या महिन्यात किंवा त्यानंतर त्याही महिन्यात सेवेत दाखल होणाऱ्या कर्मचाऱ्यांना ते जिल्हा परिषद सेवेत दाखल झाल्याच्या तारखेपासून योजनेचे सदस्य होण्याच्या तारखेपर्यंत विम्याच्या संरक्षणासाठी वर्ग ४ चे कर्मचारी रु. ५ व वर्ग ३ चे कर्मचारी रु. १० याप्रमाणे विमा हप्ता देतील व त्यांना अनुक्रमे रु. १५,००० व रु. ३०,००० एवढ्या विम्याच्या संरक्षणाचा लाभ देता येईल. योजनेच्या वर्धापनदिनापासून ते कर्मचारी परिच्छेद ८ मध्ये नमूद केलेल्या दराने वर्गणी देतील.

८. योजनेखालील वर्ग ३ व वर्ग ४ च्या कर्मचाऱ्यांस द्यावी लागणारी वर्गणी, त्याच वर्गणीतील विम्याच्या संरक्षणासाठी व बचत निधीत जमा होणाऱ्या रकमा, कर्मचारी सेवेत असताना मृत झाल्यास त्याच्या कुटुंबियांना देय होणाऱ्या विम्याची रक्कम खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे राहील :—

| वर्ग (१) | दरमहा वर्गणी (२) | संचित (बचत निधीत जमा होणारी) रक्कम (३) | आयुर्विमा निधीत विम्याच्या संरक्षणार्थ जमा होणारी रक्कम (४) | कर्मचारी सेवेत असताना मृत झाल्यास त्यांच्या कुटुंबियांना देय होणारी विम्याची रक्कम (५) |
|---|---|---|---|---|
| | (रुपये) | (रुपये) | (रुपये) | (रुपये) |
| वर्ग ३ .. | ३०.०० | २१.०० | ९.०० | ३०,००० (रु. तीस हजार) |
| वर्ग ४ .. | १५.०० | १०.५० | ४.५० | १५,००० (रु. पंधरा हजार) |

वरील तक्त्यात स्तंभ (३) मध्ये दर्शविलेल्या रकमेवर शासन वेळोवेळी जाहीर करील त्या दराने व्याज मिळेल (सध्या हा दर द.सा. द.शे. १२ टक्के आहे). धनादेशाद्वारे कोषागारात जमा करण्यात येणारी वर्गणीची वसुली कोषागारात खालील शिर्षाखाली भरण्यात यावी :—

८०११ विमा आणि निवृत्तिवेतन निधी

१०६ इतर विमा आणि निवृत्तिवेतन निधी

३. जिल्हा परिषद कर्मचारी गट विमा योजना—

(अ) विमा निधी

(ब) बचत निधी

जिल्हा कोषागारांनी या वर्गणीचे वेगळे लेखा गट विमा योजनेच्या नमुना ४ व ५ मध्ये (परिशिष्ट २ व ३) ठेवावेत व त्यांचे वेगळे जमा खर्चाचे मासिक लेखे गट विमा योजना नमुना ६ व ७ (परिशिष्ट ४ व ५) पुढील महिन्याच्या १५ तारखेपर्यंत संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांच्याकडे पाठवावा.

हा निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ३७३७/टीएसएफ, दिनांक १८ ऑगस्ट १९९० अन्वये निर्गमित होत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

डी. रंगनायन्,

सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति

सर्व विभागीय आयुक्त.

मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परिषदा } (१५० प्रती).
मुख्य लेखा व वित्त अधिकारी, सर्व जिल्हा परिषदा }

मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, महाराष्ट्र, नवी मुंबई (५ प्रती).

उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद, नाशिक, अमरावती (प्रत्येकी ५ प्रती).

संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.

संचालक, शासकीय विमा योजना, मुंबई.

सर्व कोषागार अधिकारी.

महालेखापाल (लेखा परीक्षा), मुंबई, नागपूर.

महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई, नागपूर.

वित्त विभाग.

कार्यासन १२, १३, १४, १५, १६, १७ व २०, ग्रामविकास विभाग.

निवड नस्ती, कार्यासन क्र. १८.

## परिशिष्ट १

### (गट विमा योजना—नमुना दोन)

जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या गट विमा योजनेच्या वेतन बिलातून कापून घेतलेल्या वर्गणीची आहरण व संवितरण अधिकाऱ्याने प्रत्येक वेतन बिलासोबत दोन प्रतींत जोडावयाची अनुसूची.

टीप.—भरणा रोख रकमेत करण्यात आला असेल त्या बाबतीत देखील या अनुसूचीचा वापर करावा आणि तिच्या दोन प्रती कोषागार चलनाला जोडाव्या.

जिल्हा परिषदेचे नाव :

महिना व वर्ष :

प्रधान लेखा शीर्ष : ८०११ विमा आणि निवृत्तिवेतन निधी

| वर्गाचा तपशील | एकत्रित दराने केलेली वसुली | | | विम्याच्या हप्त्याच्या दराने केलेली वसुली | | | एकूण वसुली |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | कर्मचारी संख्या | दर | रक्कम | कर्मचारी संख्या | दर | रक्कम | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| तीन | | | | | | | |
| चार | | | | | | | |
| एकूण .. | | | | | | | |

वजातीची एकूण रक्कम—

(आकड्यांत)

(अक्षरी)

(आहरण व संवितरण अधिकाऱ्यांची सही)

कोषागार कार्यालयासाठी—

प्रधान शीर्ष :

कोषागार प्रमाणकाचा क्रमांक व दिनांक :

चलनाचा क्रमांक व दिनांक :

कोषागार अधिकारी/अधिदान लेखा अधिकारी.

---

## परिशिष्ट २

### (गट विमा योजना—नमुना चार)

जमा रकमांची नोंदवही
जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांची गट विमा योजना
१९ मधील वर्गणीदारांची संख्या

| अनुक्रमांक | आहरण व संवितरण अधिकाऱ्याचे किंवा स्वीयेतर नियोक्त्याचे नाव | प्रमाणक वेतन बिल क्रमांक | १९ च्या वेतन बिलातून वसुली करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांची संख्या | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | वर्ग तीन | वर्ग चार | एकूण |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| | | | | | |

## परिशिष्ट ३

(गट विमा योजना—नमुना पाच)

सेवेत असताना मरण पावलेल्या वर्गणीदारांच्या बाबतीत १९ मध्ये करण्यात आलेल्या प्रदानांची नोंदवही

| महिना | प्रमाणक | कर्मचाऱ्यांची संख्या | | | प्रदान केलेली रक्कम (विभागणीसह) | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | वर्ग तीन | वर्ग चार | एकूण | वर्ग तीन | | वर्ग चार | | एकूण | |
| | | | | | विमा निधी | बचत निधी | विमा निधी | बचत निधी | विमा निधी | बचत निधी |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| | | | | | | | | | | |

## परिशिष्ट ४

(गट विमा योजना—नमुना सहा)

सेवानिवृत्त झाल्यावर, राजीनामा दिल्यावर वगैरे वर्गणीदारांना १९ मध्ये करण्यात आलेल्या प्रदानांची नोंदवही

| महिना | प्रमाणक | कर्मचाऱ्यांची संख्या | | | प्रदान केलेली बचत निधीची रक्कम | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | वर्ग तीन | वर्ग चार | एकूण | वर्ग तीन | वर्ग चार | एकूण |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| | | | | | | | |

## परिशिष्ट ५

(गट विमा योजना—नमुना सात)

आहरण व संवितरण अधिकाऱ्यांकडून आलेल्या गट विमा योजना नमुना तीनमधील अनुसूचीतील माहिती एकत्र करण्याची नोंदवही

| वर्गणीदारांचा गट | आहरण व संवितरण अधिकाऱ्याचे नाव | वर्षात वर्गणी भरलेल्या महिन्यांची संख्या | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १ महिना | २ महिने | ३ महिने | ४ महिने | ५ महिने | ६ महिने | ७ महिने | ८ महिने | ९ महिने | १० महिने | ११ महिने | १२ महिने |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) |
| वर्ग तीन | आ. व सं. अ. | | | | | | | | | | | | |
| | आ. व सं. अ. | | | | | | | | | | | | |
| | आ. व सं. अ. | | | | | | | | | | | | |
| | एकूण .. | | | | | | | | | | | | |
| वर्ग चार | आ. व सं. अ. | | | | | | | | | | | | |
| | आ. व सं. अ. | | | | | | | | | | | | |
| | आ. व सं. अ. | | | | | | | | | | | | |
| | एकूण .. | | | | | | | | | | | | |